पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३१९/२०१९
दिनांक : ०६/०७/२०१९

प्रति,

मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दि.**१०/०७/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **१०/०७/२०१९** रोजी दुपारी **१२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2019-20 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ०३**

**दिनांक : १०/०७/२०१९** **वेळ : दुपारी १२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **१०/०७/२०१९** रोजी दुपारी **१२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक १३/३/२०१९, २७/०३/२०१९, १०/४/२०१९, २४/४/२०१९, २६/६/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १९) सभावृत्तांत कायम करणे.

आ) दिनांक २६/६/२०१९ (कार्यपत्रिका क्रमांक ०२) चा सभावृत्तांत कायम करणे.

-----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नवनगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास आराखडयात तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये मंजूर विकास आराखडयात मौजे भोसरी येथील स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४.०० मी. रुंद रस्ता व १२.०० मी. रस्ता प्रस्तावित आहे. मौजे भोसरी येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्यादृष्टीने स.नं.१५ पै. व १४ पै.मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. (स.नं.१५ पै.) व १२.०० मी. (स.नं.१४ पै.) रुंद रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकाचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.०० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता देणेस व खर्च रक्कम अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक १०/०७/२०१९ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे अधिसूचना क्र.पीसीसी/ ३०९६ / १८०१/सीसर-२६१/नवि-२२, दि ११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग,

अधिसूचना क्र. टिएमपीएस-१८०५/१०५०/सीआर-७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि. १८/०५/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून , शासन निर्णय क्र.टीपीएस १८९२/१६०/प्र.क्र ५८/१२/पुनर्बांधणी क्र.२७/१२/ईपी मंजुरी /नवि-१३ दि.०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.मौजे दापोडी येथील स.नं ०५ पै जागामालक श्री चंद्रकांत सोपान काटे व इतर यांनी टाऊन हॉल व बस टर्मिनस ने बाधित क्षेत्र नविन भूसंपादन अधिनियमाद्वारे मनपाचे ताब्यात देणेकामी अर्ज या विभागाकडे सादर केलेला आहे. तरी मौजे दापोडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील खालील तक्त्यात दर्शिव्लेल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं | बाधित होणारे संपादन करावयाचे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.०३/२४ | टाऊन हॉल | ५ पै | ५०००.०० चौ.मी |
| २ | आरक्षण क्र .०३/२५ | बस टर्मिनस | ४ पै,०५पै व ०६ पै | २९६०० चौ.मी |
| ३ | नियोजित रस्ता | १२.०० मी | | |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणांचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी , पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनार्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम -२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३ ) अन्वये तातडीने संपादन करणेकामी मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**(उल्हास बबनराव जगताप)**

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/३१९/२०१९

दिनांक : ०६/०७/२०१९ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.